# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक (02482)-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १५/०४/२०२०

(ई-मेलने/टपालाने) आपत्ती प्राधान्य

वाचाः-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

३) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १३/०३/२०२०, दिनांक १४/०३/२०२० आणि दिनांक १५/०३/२०२०.

४) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २५/०३/२०२०.

५) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक ३१/०३/२०२०, १३/०४/२०२०.

## आदेश

ज्या अर्थी, सध्या महाराष्ट्रात नोव्हेल करोना विषाणू (nCoV-19) संसर्ग बाधित रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. करोना या विषाणूचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व करोन विषाणूचे संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होवू न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, शासनाच्या दिनांक १४/०३/२०२० च्या अधिसूचने अन्वये महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम, २०२० लागू केला आहे.

ज्या अर्थी संदर्भ क्र.४ अन्वये जिल्हयात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ६ मधील नमूद सूचनांच्या अधिन राहून दिनांक १४/०४/२०२० रोजी पर्यत नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात जमावबंदी आदेश लागू केलेला आहे व संदर्भ क्र. ५ च्या दिनांक १३/०४/२०२० च्या आदेशान्वये सदरील जमावबंदी दिनांक ३०/०४/२०२० रोजीपर्यंत वाढविण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, **मी रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यांत आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतूदीनूसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोवीड-१९ विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्याच्या अनूषंगाने खबरदारीचा उपाय म्हणून **जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय विश्रामगृहे हे केवळ कोवीड-१९ च्या अनुषंगाने डॉक्टर, पॅरामेडीकल स्टाफ तसेच कोवीड-१९ च्या संदर्भातील अत्यावश्यक सेवा बजावणारे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी** पूढील आदेशापावेतो राखीव ठेवण्यांत येत आहे.

उपरोक्त आदेशांचे पालन न करणा-या व्यक्ती, अधिकारी / कर्मचारी, संस्था अथवा समुह यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ आणि भा.द.वि. १८६० चे कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे समजण्यात येईल आणि पुढील दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

Raut

(रविंद्र बिनवडे) भा.प्र.से.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना

15/4/2020

प्रतिलीपी

१. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद जालना.

३. पोलीस अधिक्षक,जालना.

४. कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग, जालन/परतूर.

५. सर्व उपविभागीय अधिकारी जिल्हा जालना.

५. सर्व तहसिलदार जिल्हा जालना.

६. सर्व संबंधित यंत्रणा यांना मार्फत कार्यकारी अभियंता, सार्वजनीक बांधकाम विभाग जालना/परतूर.